## नि.दि.मु.क्र.१०७/२०११ मधील आय.ए. क्र. २/२०२१ ते ४/२०२१ (निशाणी ९४ ते ९६) वरील संयुक्तीक आदेश

निशाणी ९४ कडील अर्ज वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी ९५ कडील अर्ज वादीविरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी व निशाणी ९६ कडील अर्ज वादीचे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेले आहेत.

०२. वादीच्या वारसांचे असे म्हणणे आहे की वादी हा दि. ०५/०६/२०२१ रोजी कोरोनामुळे मयत झालेला आहे. त्यामुळे त्यांना प्रचंड धक्का बसलेला आहे. त्यामुळे मुदतीत वकिलांना भेटून मृत्यूदाखला व वारसांची नावे ते देऊ शकले नाहीत. त्यामुळे वादीचे वारस मुदतीत दाखल करता आलेले नाहीत. त्यामुळे त्यांना अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व वादीविरुध्द दावा अवसान पावल्याचे त्यांचे म्हणणे आहे. प्रतिवादीने त्याचे म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतलेला आहे. त्याचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटे, खोडसाळ असून विलंबासाठी कोणतेही कारण घडलेले नाही. सबब, अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावेत अशी त्याने विनंती केली आहे.

०३. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादीने कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. वादीच्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर प्रतिनिधींना दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे व ते संयुक्तीक आहे असे मला वाटते. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

०४. वादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच वादीविरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो.

वादीच्या वारसांना मयत वादीचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी.

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2022.03.10 17:16:28 +0530

दि. १०/०३/२०२२ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER